**प्रेस नोट दिनांक ०७/०४/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**रस्त्यामध्ये सापडलेली पिशवीतील रोख रक्कम ४,०००/- रुपये मालकास परत**

दि.०६.०४.२०१९ रोजी खडक पोलीस ठाणेकडील सी. आर. मोबाईल वाहनावर दिवसपाळी कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी पोलीस नाईक सुरज शेडगे, पोलीस शिपाई श्रीखंडे, महिला पोलीस शिपाई शिल्पा पवार असे गोटीराम भैय्या चौक, पुणे या ठिकाणी १९.०० वा. आले असता, ते गाडीतुन खाली उतरताना पोलीस कर्मचारी श्रीखंडे यांना एक पिशवी मिळुन आली. सदर कर्मचारी यांनी पिशवीची पाहणी केली असता, त्यामध्ये रोख रक्कम ४,०००/- रुपये आढळुन आले. सदर पिशवी व रोख रकमेबाबत नमुद कर्मचारी यांनी तेथे असलेल्या रिक्षाचालकांकडे चौकशी करता त्यांनी ५ ते ६ येथे थोडया वेळापुर्वी थांबली असल्याचे व ती मंडईचे दिशेने गेली असल्याचे सांगीतले.

सदर ठिकाणी असलेल्या रिक्षाचालकाचे मदतीने सदर व्यक्तींचा शोध घेत असताना, तेथे ५ ते ६ व्यक्ती दिसुन आल्या. सदर व्यक्तींकडे पिशवी व त्यामधील पैशाबाबत विचारणा केली असता, त्यांचेमधील इसम नामे - मारुती बन्सी कांबळे, वय ३५ वर्ष रा. म्हाळुंगे पुणे यांनी सदरची पिशवी त्यांची असुन त्यामधील रक्कम त्यांची असल्याचे सांगीतले. सदर पैशाबाबत त्यांचेकडे खातरजमा करुन सदरची रक्कम नमुद कर्मचारी यांनी त्यांचे ताब्यात देण्यात आलेली आहे.

**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर

